सायं.दैनिक
# विश्वनायक
Email : vishvanayak94@gmail.com
• संपादक : बिलाल शेख •
Mo-9422404740

बीड (महाराष्ट्र) | दैनिक | द्विभाषिक | वर्ष ०२ अंक - १२० शुक्रवार, दि.०९ मे २०२५ | आरएनआय -एमएएचबीआयएल १०५४८ | किंमत २ रू | पाने ४
Beed (Maharashtra) | Daily | BILINGUAL | Year 02 Issue - 120 Friday, Dt.09 May 2025 | TC : MAHBIL10548 | PRICE - 2 RUPEES | PAGES - 4



### प्रतिभा ताई बावीकर यांचे निधन

कळंब...येथील सेवा निवृत्त आदर्श शिक्षिका प्रतिभा ताई प्रभाकर बाविकर ( वय ९१ ) यांचे वृद्धापकाळाने देहावसान झाले . त्यांच्या मागे दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.भाजप चे शहर अध्यक्ष भैय्या बावीकर व डॉ.प्रा.समीर बावीकर यांच्या त्या आई होत्या. त्यांच्यावर कळंब येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

# बोगस गुंठेवारीसाठी ६० लाखांचा सौदा?

## तक्रारदार थेट सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांना देणार पुराव्यासह सर्व माहिती



## बोगस गुंठेवारीत सहभागी असलेल्या लोकांवर कारवाई करण्यास मुख्याधिकारी यांची टाळाटाळ कशासाठी ?

विश्वनायक न्यूज

बीड नगरपालिके अंतर्गत मोठ्या प्रमाणात बोगस गुंठेवारी झालेली आहे. सामाजिक सोयी सुविधेसाठी असलेल्या जागेची गुंठेवारी करण्यात आली असून, याबाबत चौकशी करण्याची मागणी करण्यात आलेली आहे. अशी गुंठेवारी करण्यासाठी सुमारे ६० लाख रुपयांचा सौदा झाला असल्याची चर्चा होत आहे. याबाबत तक्रार करूनही चौकशी होताना दिसत नाही. त्यामुळे तक्रारदार थेट सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांच्याशी संपर्क साधणार असल्याची माहिती असून, संपूर्ण पुराव्यानिशी अंजली दमानिया यांच्याकडे याबाबत आवाज उठविण्याची विनंती तक्रारदार करणार आहे, असे सांगण्यात येत आहे. दरम्यान, पुराव्यासहित तक्रार दाखल करूनही मुख्याधिकारी नीता अंधारे या संबंधित लोकांवर कारवाई का करत नाहीत, या बाबतचे गौडबंगाल अजूनही समोर आलेले नाही. हा अत्यंत गंभीर घोटाळा असून, यामध्ये नगरपालिकेच्या अधिकाऱ्यांसह खरेदीदार असलेल्या सगळ्यांनाच याचा मोठा परिणाम भोगावा लागणार आहे.

बीड नगरपालिके अंतर्गत अनेक प्रकारचे घोटाळे यापूर्वी झाले असल्याचे सिद्ध झाले आहे. बोगस कामांपासून ते बोगस बिल उचलण्यापर्यंत नगरपालिकेतील अधिकारी आणि खाजगी लोकांची मजल गेलेली आहे. यामधून लाखो नाही तर कोट्यावधी रुपयांची माया या लोकांनी जमा केलेली आहे. टप्प्याटप्प्याने या सगळ्यांचा हिशोब होणार असून, ज्या ज्या लोकांनी यामध्ये भ्रष्टाचार केला आहे त्या सगळ्यांना हिशोब द्यावा लागणार आहे. दरम्यान, बीड नगरपालिके अंतर्गत जनतेच्या सोयी सुविधेसाठी असलेल्या जागेची बोगस पद्धतीने गुंठेवारी करण्यात आली आहे. ही गुंठेवारी करण्यासाठी नगरपालिकेतील काही अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी सुमारे ६० लाख रुपयांचा सौदा केला असल्याची चर्चा होत आहे. ही बाब अत्यंत गंभीर असून संतापजनक आहे. याबाबतची माहिती समोर आल्यानंतर, तक्रारदाराने चौकशी करण्याची मागणी केली मात्र त्याच्या या मागणीला केराची टोपली दाखविण्यात आली. एक तर



शासनाची फसवणूक आणि दुसरीकडे जनतेचीही फसवणूक असा हा प्रकार असल्याने, संबंधित तक्रारदाराने याबाबतची तक्रार जिल्हाधिकारी यांच्यासह संबंधित असलेल्या सगळ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली आहे. याशिवाय हाय कोर्टात सुद्धा लवकरच याचिका दाखल होणार आहे. त्यामुळे या चौकशीतून सत्य काय आहे हे बाहेर येईलच. याबाबत तक्रारदाराने चौकशीची मागणी केली होती मात्र नगरपालिकेच्या मुख्याधिकारी असलेल्या नीता अंधारे यांनी यावर काहीच क्शन घेतली नसल्याचे दिसत आहे. दुसरीकडे ज्यावेळी बोगस गुंठेवारी करण्यात आली त्यावेळी, सुमारे ६० लाख रुपयांचा सौदा नगरपालिकेच्या अधिकाऱ्यांसोबत झाला असल्याची चर्चा होत आहे. हे जर खरे असेल तर हा गंभीर प्रकार आहे आणि यातील दोषींना शिक्षा होण्याची गरज आहे. यासाठी तक्रारदार हे थेट सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांच्याशी संपर्क साधणार असून, त्यांच्याकडे पुराव्यासह सगळी माहिती देणार असल्याचे समजते. या सामाजिक विषयात भ्रष्टांना शिक्षा मिळावी आणि समाजाला त्यांचे हक्क मिळावे असा उद्देश असल्याचे तक्रारदाराचे म्हणणे आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांमध्ये यामध्ये सहभागी असलेल्या प्रत्येकाला आपल्या पापाची परीक्षा द्यावी लागणार आहे.

### पुराव्यानिशी तक्रार करूनही नीता अंधारे संबंधितावर कारवाई करीत नसल्याचे गौडबंगाल काय ?

नगरपालिकेच्या मुख्याधिकारी निता अंधारे यांच्याकडे नगरपालिके मार्फत झालेल्या बोगस गुंठेवारी बाबत तक्रार करण्यात आलेली आहे. यामध्ये कोण कोण दोषी आहेत हे सुद्धा त्यांना पुराव्यासह सांगण्यात आले आहे. मात्र अंधारे मॅडम यांनी सहभागी असलेल्या कोणत्याच अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर अद्याप कसल्याच प्रकारची कारवाई केलेली नाही. अंधारे मॅडम कारवाई का करत नाहीत, आणि यामागे काय गौडबंगाल आहे याबाबतची उत्सुकता आणि चर्चा बीडकरांमध्ये होत आहे.

### बोगस गुंठेवारी करणाऱ्या आजी- माजी कर्मचाऱ्यांचे शासकीय निवासस्थानी काय काम.? सीसीटीव्ही तपासा

गुंठेवारी मध्ये संशयास्पद असलेल्या नगरपालिकेतील अनेक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा बीड शहरातील शासकीय निवासस्थानी सतत राबता असल्याचे समोर आले आहे. अशा कर्मचाऱ्यांचे शासकीय निवासस्थानी काय काम असा प्रश्न उपस्थित झाला आहे. ज्या लोकांनी बोगस गुंठेवारी केली आहे, त्यांनी याचे प्रायचित्त घेण्याची गरज आहे. मात्र हे लोक आपले पाप झाकण्यासाठी सातत्याने या परिसरात येरझरा घालत असल्याचे दिसत आहे. यामध्ये सध्या नगरपालिकेत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांसह सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचाही समावेश आहे. हे सगळे कर्मचारी या ठिकाणी एकत्र येऊन, काय करीत आहेत असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

### बोगस गुंठेवारीत सहभागी असलेल्या सगळ्यांचीच ईडीमार्फत चौकशी करण्याची मागणी

बीड नगरपालिकेमध्ये बोगस गुंठेवारी हा अत्यंत संवेदनशील विषय आहे. यामध्ये बीडकरांचे नुकसान झालेच आहे मात्र नगरपालिका ही सुद्धा डबघाईला आली आहे. वेगवेगळी कारणे समोर करून नगरपालिकेतील अधिकाऱ्यांनी जनतेची लूट केली असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे या रॅकेटमध्ये सहभागी असलेल्या नगरपालिकेतील सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची इडीमार्फत चौकशी करण्याची मागणी जनतेकडून होत आहे.



# जिल्हाधिका-यांचा बिनकामाचा जनता दरबार

### पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभारामुळे वैतागलेले पाटोदा तालुक्यातील पाचेगाव येथील शेतकरी म्हणाले हा तर जिल्हाधिका-यांचा बिनकामाचा जनता दरबार

जिल्हाधिकारी बीड यांनी आठवड्यातून ३ दिवस सोमवार, मंगळवार आणि गुरुवार सकाळी ११ ते २ या वेळेत जनता दरबार घेऊन सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारी ऐकल्या जातात.... वांझोटा जनता दरबार म्हणण्याचे कारण म्हणजे जनता दरबारात नागरीकांच्या तक्रारी अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांना (फोनवर )बोलुन विषय मार्गी लावण्याचे आदेश दिले तर नागरीकांचे समाधान होईल... आता कालची गोष्ट पाटोदा तालुक्यातील पाचेगाव येथील १० शेतकरी दि.०७ बुधवार रोजी भाड्याने गाडी करून पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभार विरोधात जिल्हाधिकारी यांना लेखी तक्रार दिली.त्यांना दुसऱ्या दिवशी जनता दरबारात बोलावले.काल दि.०८ गुरुवार रोजी आठवडी बाजार असतानाही शेतकरी पुन्हा भाड्याने गाडी करून जिल्हाधिकारी यांना भेटून मावेजा न देताच तारा ओढत असुन ते काम मावेजा मिळेपर्यंत थांबवावे अशी विनंती केली.जिल्हाधिकारी यांनी पवनचक्की कंपन्यांनी सशुल्क संरक्षण मागितले असल्याने मला काम थांबवता येत नाही असे म्हणत तुम्ही पाटोदा तालुक्यातील उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांना भेटून ते ठरवतील तो मावेजा घ्या.मला यात काहीही करता येत नाही असे सांगितले आणि त्यांना वाटं लावले...आता पिडीत शेतकऱ्यांना असा प्रश्न पडला की जिल्हाधिकारी यांच्या हातात काही नाही तर मग आम्हाला गाडी भाडे करून दुसऱ्या दिवशी जिल्हाधिकारी कार्यालयात का बोलावले????? त्यामुळे पाचेगाव शेतकऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या जनता दरबाराला बिनकामाचा दरबार म्हणाले.

# बीड नगर परिषदेने शहरातील नागरिकांच्या सहनशीलतेचा अंत पाहू नये-शेख निजाम

## पाणीपुरवठा सुरळीत करा विशेष स्वच्छता मोहीम राबवा शहरातील सर्व पथदिवे सुरू करा -भागवत तावरे





बीड ।प्रतिनिधी

मागील सहा महिन्यापासून बीड शहरांमध्ये नगरपरिषदेच्या नाकर्तेपणामुळे व नियोजन शून्यते मुळे झालेल्या अभूतपूर्व पाणी पुरवठाच्या संदर्भात बीड शहरातील सर्वसामान्य नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात रोष निर्माण झाला होता त्याच अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शेख निजाम व लोकपत्रकार भागवत तावरे,युवा नेते बळी गवते यांच्या नेतृत्वाखाली बीड नगरपरिषद प्रशासना विरोधात भव्य हंडा मोर्चाचे आयोजन दिनांक ९ मे २०२५ रोजी करण्यात आले होते सदरील मोर्चामध्ये बीड शहरातील सर्वपक्षीय नेते नगरसेवक शेख अमर,मुन्नाभाई इनामदार , सय्यद इलियास, कय्युम इनामदार, आयुब पठाण, सय्यद फहीम,सय्यद आझम ,शेख हमीद,शहबाज कादरी, सत्तार इनामदार,शेख कदीर,शेख जाकीर, सादिक पठाण,शेख पाशा, जयंत वाघ,यांच्या सहित हजारो सुजाण नागरिक व महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती सदरील मोर्चा च्या निमित्ताने उपस्थित असलेल्या भारतीय जनता पार्टीचे मा.जिल्हा परिषद अध्यक्ष मीरा ताई गादले, शहराध्यक्ष अशोकजी लोढा ,भारतीय जनता पार्टीच्या अँड संध्याताई राजपूत, नगरसेवक सय्यद इलियास, मुन्ना इनामदार ,रुपाली देशपांडे , पठाण रेहानाताई ,प्रीतताई कुकडेजा, सोनलताई पाटील, आदी आदींनी पाणीपुरवठा स्वच्छता व नगर परिषदेच्या गैरव्यवहार बाबत संबोधित केले यावेळी बोलताना लोकपत्रकार भागवत तावरे यांनी बीड नगर परिषदेमध्ये एकूणच चाललेला निरंकुश गैरव्यवहार व त्यामुळे होणारी बीड शहरातील नागरिकांची हेळसांड या प्रश्नावर आपले सविस्तर मत मांडले व सदरील मोर्चाचे आयोजक शेख निजाम यांनी आपल्या संबोधनांमध्ये बीड नगर परिषदेने आपले कर्तव्य समजून बीड नगरपरिषदेच्या माध्यमातून शहरातील नागरिकांकरिता पायाभूत सुविधा उपलब्ध करून द्यावा ज्यात प्रामुख्याने विस्कळीत असलेला पाणीपुरवठा सुरळीत करून किमान आठ दिवसाला शहराला पाणीपुरवठा करण्यात यावा येणाऱ्या पावसाळ्यापूर्वी बीड शहरात विशेष स्वच्छता मोहीम राबवून युद्ध पातळीवर नालेसफाई व कचऱ्याची विल्हेवाट व व्यवस्थापन करण्यात यावे व बीड शहरातील बंद अवस्थेत असणाऱ्या सर्व पथदिवे चालू करण्यात यावे अशा मागण्या वेळ मुख्याधिकारी नीता अंधारे यांना निवेदनात दिलेल्या मागण्या पालकमंत्री मा.अजित दादा पवार यांच्या सूचनेनुसार मान्य केल्या व तात्काळ आज पासून सुरळीतपणे पाणीपुरवठा व स्वच्छता व ईतर सर्व कामे पूर्ण करून करू अशी ग्वाही शिष्टमंडळास दिली यावेळी भव्य हंडा मोर्चात मोठ्या संख्येने शहरातील नागरिक उपस्थित होते व यामध्ये महिलांची संख्या मोठ्या प्रमाणात होती

### आजपासून सुरळीत पाणीपुरवठा होणार-मुख्याधिकारी नीता अंधारे

सायं.दैनिक
विश्वनायक
Email : vishvanayak94@gmail.com
• संपादक : बिलाल शेख • Mo-9422404740
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA )


# बालाजी फिल्डवेल सोसायटी लि.पेठवडज ला राज्यस्तरीय लोकरत्न पुरस्कार जाहीर

## अशोकराव डावकोरे व सौ.सुनिता डावकोरे यांना लोकरत्न पुरस्कार जाहीर होताच सर्व स्तरातून अभिनंदनचा वर्षाव सुरू

नांदेड

लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने दरवर्षी प्रमाणे याही वर्षी विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या संस्थांना व व्यक्तींना राज्यस्तरीय लोकरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात येते.या कार्यक्रमासाठी माननीय महामहीम राज्यपाल हरिभाऊ नाना बागडे , राज्याचे सामाजिक न्याय मंत्री मा. संजयजी शिरसाठ, कॅबीनेटमंत्री अतुलजी सावे, कृषिमंत्री माणिकराव कोकाटे,

मा. पालकमंत्री तथा मंत्री खासदार सांदिपानजी भुमरे पाटील, माजी खा. इम्तियाज जलील, आ. प्रदीप जैस्वाल,आ. संदीप क्षीरसागर,आ. प्रशांत बंब,राष्ट्रसंत रामगिरीजी महाराज, मराठवाड्यातील आय ए. एस./ आय पी एस अधिकारी यांचीही उपस्थिती राहणार आहे. हा लोकरत्न पुरस्कार सोहळा संभाजीनगर येथील संत एकनाथ रंगमंदिर याठिकाणी जून महिन्यात होणार आहे. या लोकरत्न पुरस्कार सोहळ्यात श्री बालाजी फिल्डवेल सोसायटी लि. पेठवडज ता.कंधार जि.नांदेड या सोसायटीला पुरस्कार जाहीर झाला असून सोसायटीच्या सर्वेसर्वा सौ.सुनिता अशोकराव डावकोरे अध्यक्षा व श्री अशोकराव श्यामराव डावकोरे साहेब तांत्रिक सल्लागार यांना त्यांच्या कार्याची दखल घेऊन लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने छत्रपती संभाजीनगर येथे लोकरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. श्री बालाजी फिल्डवेल सोसायटीच्या माध्यमातून अशोकराव डावकोरे साहेब यांनी पेठवडज गावात अनेक उपक्रम राबवित असतात.शेतकरी बांधवांना नांगरटी साठी अर्ध्या किमतीत ट्रॅक्टरने नांगरणी, लग्न असेल तर कन्या दान म्हणून आर्थिक मदत, रस्ता बनवून दिला जातो, फिल्टर पाणी घरपोच मोफत सेवा, गावातील गरीब नागरिकांसाठी



अंत्यविधीसाठी आर्थिक मदत दिली जाते,पहिली ते बारावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना बक्षीस देऊन प्रोत्साहन दिले जाते.असे एक नाही अनेक उपक्रम सोसायटीच्या माध्यमातून राबवित असतात. श्री.अशोकराव डावकोरे व सौ.सुनिता डावकोरे हे पती पत्नी पेठवडज गावाची जनसेवा हीच ईश्वरसेवा म्हणून सेवा करतात. त्यामुळे त्यांच्या कार्याची दखल घेऊन श्री बालाजी फिल्डवेल सोसायटीचे सर्वेसर्वा म्हणून सौ.सुनिता अशोकराव डावकोरे व श्री अशोकराव श्यामराव डावकोरे साहेब यांना लोकरत्न पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

लोकशाही पत्रकार संघाचा लोकरत्न पुरस्कार जाहीर केल्याबद्दल निवड पत्र देताना संस्थापक अध्यक्ष बीबी वैद्य, (संपादक दैनिक युवती राज ) राष्ट्रीय उपाध्यक्ष संदीप जाधव, प्रभाकर पांडे प्रदेश उपाध्यक्ष, बाजीराव पाटील गायकवाड दैनिक लोकनेता मराठवाडा विभागीय संपादक तथा लोकशाही पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य विभागीय सचिव, इस्माईल महेबुब शेख लातूर जिल्हा उपाध्यक्ष तथा दैनिक लोकनेता विभागीय उपसंपादक,गोविंद मोरे जिल्हा अध्यक्ष लोकशाही पत्रकार संघ नांदेड, सरपंच तथा पत्रकार संतोष पाटील जाधव पिंपळदरीकर यांनी राज्यस्तरीय लोकरत्न पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले असून सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



# जिजाबाई गायकवाड यांच्या रक्षेतून वृक्ष लागवड –पर्यावरण संवर्धनाचा अनोखा संदेश

बिलाल कुरेशी

कळंब तालुक्यातील भाटशिरपुरा गावातील जेष्ठ नागरिक जिजाबाई लिंबराज आबा गायकवाड यांचे दिनांक ५ मे रोजी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनामुळे परिसरात शोककळा पसरली आहे. मात्र त्यांच्या कुटुंबियांनी पारंपरिक विधींना एका सकारात्मक वळणावर नेत, समाजासमोर एक प्रेरणादायी उदाहरण ठेवले आहे.

जिजाबाई यांच्या रक्षेचे पारंपरिक नदी विसर्जन न करता, त्यांच्या कुटुंबियांनी रक्षेतून वृक्षांची लागवड केली. राखेचा उपयोग खत म्हणून करत विविध प्रकारची झाडे लावण्यात आली. मृत्यूच्या दुःखद प्रसंगालाही त्यांनी जीवनदायिनी हरित चळवळीचे स्वरूप दिले.

हे वृक्ष आता केवळ जिजाबाईंच्या स्मृतीरूपात उभे राहत नाहीत, तर पर्यावरण संवर्धनाचा एक सशक्त संदेशही देत आहेत.

आजच्या काळात जिथे प्रदूषण आणि वृक्षतोडीची समस्या गंभीर बनत आहे, तिथे गायकवाड कुटुंबियांचा हा निर्णय एक आदर्श सामाजिक संदेश देतो – मृत्यूनंतरही निसर्गासाठी काहीतरी चांगले करून जाता येते.या उपक्रमाचे परिसरात सर्वत्र कौतुक होत असून, अनेकांनी ही संकल्पना आत्मसात करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.जिजाबाई गायकवाड यांच्या स्मृतिप्रित्यर्थ लावलेले हे वृक्ष भविष्यात हरित श्रद्धांजलीचे प्रतीक ठरतील, यात शंका नाही.या अनोख्या उपक्रमासाठी संभाजी ब्रिगेडचे प्रदेश संघटक अतुल गायकवाड व त्यांच्या कुटुंबियांनी उचललेल्या या पावलाचे सर्वत्र स्वागत होत आहे

# शहरातील हातपंप इलेक्ट्रॉनिक पंप तत्काळ दुरुस्त करा

बीड शहरात पाण्याची तीव्र त्यांच्याही निर्माण झाली असून नागरिकाची पाण्यासाठी भटकंती सुरू आहे यावर मत करण्यासाठी हात पंप व इलेक्ट्रॉनिक पंप तत्काळ दुरुस्त करावेत अशी मागणी बीड जिल्हा काँग्रेस कमिटी अल्पसंख्यांक विभागाचे माजी शहराध्यक्ष मोहम्मद खमरोदिन यांनी नगर परिषदेच्या मुख्याधिकारी यांच्याकडे केली आहे मुख्य अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात मोहम्मद खमरोद्दीन यांनी म्हटले आहे की सध्या बीड शहरात मध्ये प्रमाणात पाणी टंचाई असून पाणी पुरवठा २० ते२५ दिवसा आड व कमी दबाने होत आहे उन्हाची तीव्रता दिवसे दिवस वाढत चालली असून पाण्याची टंचाई निर्माण होऊ लागल्याने महिलांना ठिकठिकाणी पाण्यासाठी भटकती करावी लागत आहे हेच वास्तव समोर ठेवून शहरातील हात पंप व इलेक्ट्रॉनिक पंप हे मोठ्या प्रमाणात नादुरुस्त आहेत ते बंद असल्याने नागरिकाच्या अडचणी अधिक भर पडली आहे न प प्रशासनाकडे वेळोवेळी तक्रारी अर्ज निवेदने देऊन ही हात पंप दुरुस्त करण्यास अनास्था दिसून येत आहे बीड शहरातील नागरिकांना महिनाभरापासून नळाला पाणी आलेले नसल्याने नागरिका वर पाणी पाणी करण्याची वेळ आली या बाबीकडे न प प्रशासन गंभीर्याने पाहायला तयार नाही नगर परिषदेच्या मुख्य अधिकारी प्रशासक यांनी लक्ष घालून शहरातील बंद असलेले हात पंप इलेक्ट्रॉनिक पंप त्वरित दुरुस्त करावेत व नागरिकाची पाण्यासाठी होणारी वन वन वाचवावी असे मोहम्मद खमरोदीन यांनी म्हटले आहे



# नांदा ग्रामपंचायतच्या ग्रामविकास अधिकारी माहिती देण्यास उदासीन

आष्टी/प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील नांदा ग्रामपंचायतच्या ग्रामविकास अधिकारी यांचे गावातील ग्रामस्थाकडे लक्ष नाही .नांदा गावांमध्ये सार्वजनिक शौचालय नाही महिलांना उघड्यावर शौचालायला जावे लागते गावांमध्ये जाताना मोठ्या प्रमाणात दुर्गंधी येत आहे.नांदा गावांमध्ये कोणत्याही शासकिय सुविधा नाहीत ग्रामविकास अधिकारी यांना शासकिय मानधन मिळते परंतु ग्रामस्थांचे कोणतेही कामे वेळेवर पुर्ण होत नाहीत.ग्रामस्थांना वेळेवर कोणतेही कागदपत्रे मिळत नाहीत.सरकारने प्रधानमंत्री आवास योजना घरकुल राबवली आहे.परंतु ग्रामविकास अधिकारी सतत गैरहजर आसल्यामुळे कोणाचे घरकुल यादीत नावे आले हे कळत नाही .गांवामध्ये मासिक ग्राम सभा होत नाही ग्रामस्थांचे प्रश्न मार्गी लावण्याचे काम हे ग्रामविकास अधिकारी यांचे आहे परंतु ग्रामविकास अधिकारी गावांमध्ये येत नसल्याने प्रश्न मार्गी लावणार कोण असा सवाल ग्रामस्थ करत आहे ?गांवामध्ये पाणी वेळेवर येत नाही.गांवामध्ये कचरा कुंडी नाही घनकचरा गावातील जनतेनी टाकायचा कुठे कचराकुंडी नसल्याने गांवामध्ये घाणीचे साम्राज्य. शासनाकडुन १५व्या वित्त आयोगामार्फत ग्रामपंचायतला मोठ्या प्रमाणात निधी येतो तो जातो कुठे? भारत स्वातंत्र्य होऊन७५वर्षे झाले आहेत पण ग्रामपंचायतला गावांमध्ये अद्यापही जागा उपलब्ध नाही. तलाठी कार्यालय इमारतीत ग्रामपंचायत कार्यालय आहे. ग्रामपंचायतला खिडकी आहे परंतु दरवाजे नाहीत खिडकी तोंडुन शासकीय कागदपत्रे जर चोरीला गेले तर यांना जबाबदार कोण ?याला जबाबदार कार्य दक्ष ग्रामविकास अधिकारी या जबाबदार राहतील का? कारण त्या गांवात येत नाही ग्रामस्थांमध्ये अशी चर्चा आहे.ग्रामविकास अधिकारी सांगतात १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतुन माझ्या कालावधीत कोणतेही कामे झाली नाहीत मग हा निधी कोणाच्या घशात गेला. नांदा गावची लोकसंख्या ही ५००ते६००आहे या गावासाठी आलेला निधी गावातील विकासासाठी आहे.गांवाच्या विकासासाठी ग्रामविकास अधिकारी यांनी दाखवून द्यावे की मी हा विकास केला. ग्रामविकास अधिकारी आपली काही कारणे दाखवत हजर नसतात त्या सतत गैरहजर असतात त्यामुळे गावचा विकास होणार कसा असा सवाल नांदा गांवातील ग्रामस्थ करत आहे.

# उज्वल यशाची परंपरा कायम: शाम ज्यु. कॉलेज, दहिफळ (वड) चा १००% निकाल

केज । प्रतिनिधी

शिक्षण क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या शाम ज्युनियर कॉलेज, दहिफळ (वड) ने यंदाही आपल्या यशाची परंपरा कायम ठेवली आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या बारावीच्या परीक्षेच्या निकालात कॉलेजने १००% निकालाची घवघवीत कामगिरी केली आहे. या यशामागे विद्यार्थ्यांचे अथक परिश्रम, पालकांचे सहकार्य आणि शिक्षकवृंदाचे समर्पित मार्गदर्शन आहे. विज्ञान, कला शाखेतील सर्वच विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली असून, अनेकांनी 'पहिल्या श्रेणीत' उत्तीर्ण होण्याचा मान



मिळवला आहे. विज्ञान शाखेचा १००% निकाल लागला असुन कला शाखेचा ९६% निकाल लागला आहे पैकी विज्ञान शाखेतून कु. शिंदे सृष्टी शरद हिने ९३ % घेत प्रथम तर कु. नागरगोजे श्वेता रामदास हिने ९२% घेत द्वितीय व कु. आंधळे पायल ज्ञानोबा हिने ९१% घेत तृतीय क्रमांक मिळवला आहे .तसेच कला शाखेतून जगताप आर्यन दत्तात्रय याने ८२% घेत प्रथम तर वाघमारे सागर रविंद्र याने ८१% घेत व्दितीय व ढाकने सुनील नामदेव याने ७९% घेत तृतीय क्रमांक पटकावला आहे. या यशाबद्दल संस्थेचे सचिव इंजि.शरद गदळे, अध्यक्ष डॉ. शशिकांत दहिफळकर व कोषाध्यक्ष डॉ. शालीनी कराड (गदळे ) तसेच कॉलेजचे प्राचार्य श्रीम.जयश्री शरद गदळे ( इप्पर ) उपप्राचार्य गंदगे आर.व्हि. सर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत प्राचार्य श्रीम. जयश्री शरद गदळे यांनी शिक्षकांचे अभिनंदन करताना सांगितले की, कॉलेजचे उद्दिष्ट गुणवत्तापूर्ण शिक्षण देऊन विद्यार्थ्यांना उज्वल भविष्याची दिशा देणे हेच आहे. गावकऱ्यांनीही या यशाचा आनंद व्यक्त करत कॉलेजच्या वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



बीडचे माजी विभागीय पोलीस अधिकारी संतोषजी वाळके साहेब हे बीड येथे आले असता त्यांची भेट घेतली.

# भारत सरकार मान्यता प्राप्त राष्ट्रीय विश्वगामी पत्रकार संघाच्या केज तालुक्याची कार्यकारिणी जाहीर



केज । प्रतिनिधी

भारत सरकार मान्यता प्राप्त राष्ट्रीय विश्वगामी पत्रकार संघ केज तालुक्याची कार्यकारणी जाहीर झाली असून राष्ट्रीय अध्यक्ष संतोष निकम यांच्या आदेशाने तथा मराठवाडा कार्याध्यक्ष दशरथ रोडे याच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय विश्वगामी पत्रकार संघाच्या केज तालुक्याच्या नव्या कार्यकारिणीची नुकतीच घोषणा करण्यात आली आहे. या नव्याने गठीत झालेल्या कार्यकारिणीत अध्यक्षपदी अजय भांगे यांची फेरनिवड करण्यात आली असुन उपाध्यक्षपदी प्रखर लेखनीचे सुदेश दादा शिरसट यांची नियुक्ती तर संघटक म्हणून अजमोदीन इनामदार यांची आणि दै.जननेताचे संपादक सनी शेख यांची तालुका सचिवपदी फेरनिवड करण्यात आली आहे.

या निवडीमुळे केज तालुक्यातील पत्रकारिता क्षेत्रात नवचैतन्य निर्माण होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. संघटनेच्या माध्यमातून पत्रकारांच्या हक्कांसाठी अधिक प्रभावीपणे कार्य केले जाईल, असा विश्वास दै. वादळ वार्ताचे संपादक तथा नवनिर्वाचीत केज तालुकाध्यक्ष अजय भांगे यांनी व्यक्त केला आहे. या निवडीमुळे त्यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.

# धारुर ग्रामीण रुग्णालय हे १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय करण्यासाठी प्रयत्नशील - आ. प्रकाशदादा सोळंके

किल्लेधारुर / प्रतिनिधी

धारूर ग्रामीण रुग्णालयाचे रुपांतर १०० खटांचे उपजिल्हा रुग्णालयात रुपांतरीत करण्यासह ट्रामा केअर सुरु करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे प्रतिपादन माजलगाव मतदारसंघाचे आमदार प्रकाशदादा सोळंके यांनी डायलेसिस व कुटूंब कल्याण शस्त्रक्रिया शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी केले.




येथील ग्रामीण रुग्णालयात बिन टाक्याची कुटूंब कल्याण शस्त्रक्रिया शिबिर, डायलेसिस सेंटर व महात्मा फुले आरोग्य सेवा केंद्राचे उद्घाटन आमदार प्रकाशदादा सोळंके यांच्या हस्ते मंगळवार दि.६ रोजी करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून जिल्हा शल्यचिकित्सक संजय राऊत यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात महात्मा फुले जनआरोग्य सेवा केंद्र, डायलेसिस सेंटरची फित कापुन उद्घाटन करुन झाली. यावेळी बोलताना आ. सोळंके यांनी मतदारसंघातील गोरगरीब जनतेला जलद व चांगल्या दर्जाची आरोग्य सेवा मिळावी यासाठी माजलगाव येथे स्त्री रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, वडवणी येथे ग्रामीण रुग्णालय, धारुर तालुक्यातील तेलगाव येथे ट्रामा केअर युनिट व ग्रामीण रुग्णालय उभारल्याचे सांगितले. याच धर्तीवर धारुर ग्रामीण रुग्णालयालाही उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा मिळवून १०० खाटांचे रुग्णालय व ट्रामा केअर युनिट सुरु करण्यासाठी शासन दरबारी प्रस्ताव दाखल केल्याचे सांगितले. जिल्ह्यात एकमेव असलेल्या डायलेसिस सेंटरच्या माध्यमातून येथील वैद्यकीय अधिकारीच नव्हे तर कर्मचाऱ्यांनीही रुग्णाना चांगली व दर्जेदार आरोग्य सेवा द्यावी अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक संजय राऊत यांनी मार्गदर्शन केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस सय्यद शाकेर, तालुकाध्यक्ष आमोल जगताप, शहराध्यक्ष नितिन शिनगारे,

हे पत्रक मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक शेख बिलाल शेख युसुफ यांनी आर.एम. प्रिंटर्स, बार्शी रोड बीड – ४३११२२ येथे छापून सायं.दैनिक विश्वनायक कार्यालय, खासबाग खाजानगर देवी रोड, बीड ता.बीड जिल्हा बीड–४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशितकेले आहे.संपादक शेख बिलाल शेख युसुफ मो.८६८६८८८९८ Email : vishvanayak94@gmail.com